## नियमित दिवाणी दावा क्र. १०४/२०१५ मधील नि. ७३ वरील आदेश

**सीएनआर नं.MHAH230002512015**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी नं.८ मारुती नारायण शेलार हे दि.१२/०८/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयत प्रतिवादी नं.८ चे कायदेशिर वारस मुदतीमध्ये रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते, परंतु वादींना मयताबाबतचे कागदपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने मयत प्रतिवादी नं.८ चे वारस मुदतीमध्ये रेकॉर्डवर घेता आले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा प्रतिवादी नं.८ याचेविरुध्द अबेट झाला आहे. वादीचे कथनानुसार, प्रतिवादी नं.८ चे वारस दाव्यात योग्य त्या मुदतीत अभिलेखावर घेणेकामी वादीने जाणीवपुर्वक टाळाटाळ अथवा विलंब केलेला नाही. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र.८ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. झालेला उशिर न्यायाचे दृष्टीने माफ करून मिळणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत घेतली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी अर्जामध्ये कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ८ हे दि.१२/०८/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. वादीतर्फे दि.०४/१०/२०२३ रोजी नि.८० लगत सादर केलेले मृत्यु प्रमाणपत्र (निशाणी ८१) चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ८ मारुती नारायण शेलार हे

दिनांक १२/०८/२०२२ रोजी बेलवंडी बु., ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाले असून सदरचे प्रमाणपत्र दिनांक १२/०६/२०२४ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज दि. ०७/०८/२०२४ रोजी म्हणजेच २३ महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुतचा दावा कब्जा मिळणेसाठी, मोजणी व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने प्रतिवादी क्र.८ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज नि.७३ प्रतिवादींना रक्कम रु.२००/–कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची पुर्तता झाल्यानंतर मयत प्रतिवादी क्र.८ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करण्यात येईल.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2024.12.13 10:54:53 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १२/१२/२०२४.

**( एस.पी.केकान )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.